ISSN 2349-1027

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCHERS

(UGC Approved,Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year -X, Issue - XIX, Vol. - III | Impact Factor 6.50 (GRIFI) | Aug. 2023 To Jan. 2024

## बी रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

## व

## इंडियन कॉन्सिल ऑप फिलॉसॉफिकल रिसर्च , नवी दिल्ली,

## महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद

## यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत

## महाराष्ट तत्त्वज्ञान परिषदेचे ३९ वे अधिवेशन

## दिनांक २८ ते ३० डिसेंबर २०२३

# संताचे धर्मचिंतन

EDITOR IN CHIEF

Dr. GYANDEV M. UPADE

## UGC Journal Details

| | |
|---|---|
| Name of the Journal : | Indo Western Researchers |
| ISSN Number : | 23491027 |
| e-ISSN Number : | |
| Source: | UNIV |
| Subject: | Multidisciplinary |
| Publisher: | Jyotichandra Publication |
| Country of Publication: | India |
| Broad Subject Category: | Multidisciplinary |

Print

नोट :- या पुस्तकामध्ये प्रकाशीत करण्यात आलेल्या शोधनिबंधातील मते ही त्या-त्या लेखकांची वैयक्तिक असून त्यावावत संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.


IMPACT FACTOR 6.50

ISSN 2349-1027

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for All Subjects

# INDO WESTERN RESEARCHERS

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XIX, Vol. III
Year- X,Bi-Annual(Half Yearly)
(Aug. 2023 To Jan. 2024)

Editorial Office :
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Website
www.irasg.com

Contact : - 8484818000
09423346913 / 09637935252
09503814000 / 07276301000

E-mail :
visiongroup1994@gmail.com
interlinkresearch@rediffmail.com
mbkamble2010@gmail.com

Published by :
Indo Asian Publication,
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-



EDITOR IN CHIEF

Dr. Gyandev M. Upade
Head, Dept. of Philosophy , B. Raghunath Arts, Comm., Science Mahavidyalaya, Parbhani, Dist. Parbhani (M.S.) India

CHIEF ADVISIOR

Dr. Vilas Sonawane
Principal, B. Raghunath Arts, Comm., Science Mahavidyalaya, Parbhani, Dist. Parbhani (M.S.) India

MEMBER OF EDITORIAL BOARD

Dr. Madhav Haibatkar
Dr. Girish Kausadikar
Dr. Madhav Patil
Bhagwan Kale
Wamankumar Wani
Dr. Bhagwan Shendge
Dr. Nagorao Palwade
Dr. Shivaji Vaidya
Dr. Suresh Bhalerao
Dr. Pravin Lonarkar
Nilkant Kapase

Issue - XIX, Vol. - III
IWR
IMPACT FACTOR 6.50
ISSN 2349-1027
Aug. 2023 To Jan. 2024

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 52 | भारतीय लोकशाही : एक तात्विक विचार<br>**डॉ. खलील नबीसाब सय्यद** | 1 |
| 53 | संत गाडगेबाबा यांचे सामाजिक कार्य<br>**डॉ. कल्पना गो तायवाडे** | 4 |
| 54 | संत तुकारामांचा व्यवहारिक धर्म<br>**डॉ. बाजीराव पाटील** | 7 |
| 55 | मन्मथ स्वामी यांचे धर्मचिंतन<br>**डॉ. वेदप्रकाश डोणगावकर** | 13 |
| 56 | संत संकल्पना<br>**डॉ. नवनाथ रासकर** | 19 |
| 57 | संतांचे धर्मचिंतन समाज बांधणीत आजच्या काळीही उपयुक्त - वै. ह. भ. प. सोनोपंत दांडेकर<br>**सौ. वर्षा नितीन जपे** | 24 |
| 58 | श्री गुलाबराव महाराजांचे तत्त्वज्ञान क्षेत्रातील योगदान<br>**डॉ. सुनिलदत्त एस. गवरे** | 28 |
| 59 | राजर्षी शाहू महाराजांचे धर्म चिंतन<br>**डॉ.ग्यानदेव उपाडे** | 37 |
| 60 | बौद्ध धर्माचा उदय, विकास, ऱ्हास आणि डॉ. आंबेडकरांचा बौद्ध धम्म: एक तात्विक विश्लेषण<br>**डॉ. मीरा काशीनाथ शेळके** | 43 |
| 61 | संत तुकारामांचे धर्मचिंतन : एक तात्त्विक अवलोकन<br>**डॉ. रेखा मारोतराव शेरकर** | 52 |
| 62 | संत गाडगे महाराज यांची धर्मचिकित्सा<br>**जगन्नाथ विठ्ठलराव कदम, डॉ. जी. एम. उपाडे** | 55 |
| 63 | संत नामदेव : धर्मचिंतनातील एक अलौकिक व्यक्तिमत्व<br>**डॉ. नरेंद्र रघटाटे** | 60 |
| 64 | संतांचे धर्मचिंतन<br>**सोनाली सुरेश पेकम** | 66 |
| 65 | सांप्रदायिक सौहार्द वाढविण्यात सुफी आणि भक्ती चळवळीची भूमिका<br>**डॉ. तबस्सुम शेख** | 68 |

IMPACT FACTOR 6.50
ISSN 2349-1027
Indo Western Researchers (IWR)
Issue : XIX, Vol. III
Aug. 2023 To Jan. 2024
www.irasg.com



# मन्मथ स्वामी यांचे धर्मचिंतन

**डॉ. वेदप्रकाश डोणगावकर**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय,
वाशिम, जि. वाशिम

जगाच्या पातळीवर भारताची भूमी ही आध्यात्मिक भूमी मांनली जाते. या भारताच्या भूमीवर अनेक ऋषीमुनी, संत, महात्मे यांनी आपल्या चिंतनातून जे विचार मांडले ते आज केवळ भारतासाठीच नव्हे तर सबंध जगासाठी लामदायी ठरत आहेत. कारण या सर्व ऋषीमुनी, संत, महात्मे व महापुरुषांनी मांडलेले विचार हे प्रामुख्याने मनुष्याला सत्कर्म करण्यासाठी प्रेरित करणारे आहेत. या सर्वांनी जे विचार मांडले त्यातून एक आदर्श, मानवतावादी, न्यायप्रिय समाज निर्माण करण्याची प्रेरणा मनुष्याला मिळू शकते, अशा स्वरूपाचे आहेत. याच ऋषीमुनी, संत महात्मे व महापुरुषांच्यां शृंखलेत महाराष्ट्राच्या वीड जिल्ह्यातील संत मन्मथ स्वामी यांच्या नावाचाही आपल्याला उल्लेख करावा लागेल.

**मन्मथ स्वामी यांचा परिचय :**

मन्मथ स्वामी हे एक वीरशैव परंपरेतील संत आहेत. त्यांचा जन्म वीड जिल्ह्यातील नेकनूर या गावी इ.स. १५६० च्या सुमारास झाला. नेकनूर हे त्यांचे आजोळ होते. त्यांचे मूळ गाव उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब हे होय. त्यांच्या वडिलांचे नाव शिवलिंग स्वामी आणि आईचे नाव पार्वतीवाई होते. हे दोघेही पती-पत्नी वीरशैव धर्म परंपरेतील शिवभक्त होते. यांच्या आचार आणि विचाराचा संस्कार कळत नकळत मन्मथ स्वानी यांच्यावर झाला. मन्मथ स्वामी हे तीक्ष्ण बुद्धीचे होते. साधारणतः वयाच्या आठव्या वर्षानंतर मन्मथ स्वानी यांना दीक्षा देऊन मानूर मठाच्या सानिध्यात ठेवण्यात आले. त्या मठात असलेले आचार्य हे त्यांचे गुरु होते. त्या मठातच राहून मन्मथ स्वामी यांनी वेद, श्रुती, अगम, पुराण, गीता आणि विविध दर्शन आदींचा अभ्यास केला. त्यांनी या संस्कृत साहित्यासह कन्नड साहित्याचाही अभ्यास केला. ते एक चिकित्सक अभ्यासक होते. त्यांनी केलेल्या अभ्यासावर अनेक वर्ष चिंतन केले. विशेष म्हणजे त्यांनी आपले हे सर्व चिंतन साहित्य रूपाने मांडण्याचा संकल्प केला होता. त्या अनुषंगानेच ते कळंब या गावापासून काही अंतरावर असलेल्या हडोंगरी येथील कड्यामध्ये असलेल्या एका गुफेमध्ये राहावयास गेले. त्याच ठिकाणी राहून त्यांनी विपुल अशी ग्रंथसंपदा रचली.

**मन्मथ स्वामी यांची ग्रंथ संपदा :**

मन्मथ स्वामी यांनी आपल्या हयातीत गुरुगीता, ज्ञानबोध, स्वयंप्रकाश, अनुभवानंद, शिवगीता आदी

महत्त्वपूर्ण ग्रंथांची रचना केली. याशिवाय श्रीपरमरहस्य सारख्या ग्रंथावर टीका लिहिली. तसेच त्यांनी इतर अनेक ओव्यांची सुद्धा रचना केली आहे. त्यांच्या त्या आव्यां संग्रह आज त्यांची गाथा म्हणून ओळखली जाते. या सर्व ग्रंथांपैकी त्यांच्या ज्ञानबोध, स्वयंप्रकाश, श्रीपरमरहस्य आणि इतर काही ओव्यांचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, मन्मथ स्वामी हे मुळात एक तत्त्वज्ञ सुद्धा आहेत. त्यांनी या सर्व साहित्यातून विविध विषयांवर केलेले भाष्य हे तत्त्विक स्वरूपाचे आहे. वेदांत दर्शनाच्या अनुषंगाने त्यांचा स्वयंप्रकाश हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी ब्रह्म, जीवात्मा, ब्रह्म पुरुष, तत्त्वमासी अशा अनेक संकल्पनांचे विश्लेषण केले आहे. त्यांची दृष्टांत देण्याची पद्धत, एखाद्या विषयाचे केलेले विश्लेषण हे अत्यंत मार्मिक स्वरूपाचे आहे. त्यांच्या ओव्यातून हे स्पष्टपणे जाणवते की, ते सत्यनिष्ठ आणि परखड विचार मांडणारे मध्ययुगीन तत्त्वज्ञ होते. मन्मथ स्वामी यांनी आपल्या साहित्यातून, मूळ तत्त्व काय आहे ? त्याचे स्वरूप कसे आहे ? त्या मूळ तत्त्वाला जाणून घेणाऱ्या जीवाचे स्वरूप कसे आहे ? जीवाचा आणि मूळ तत्त्वाचा संबंध काय आहे ? जीव मूळ तत्त्व स्वरूपी होऊ शकतो का ? त्यासाठी त्या जीवाने काय करावे ? जीवाचे अंतिम ध्येय काय आहे ? इतकेच नव्हे तर संसारिक जीवन जगत असताना मनुष्याने कशाप्रकारे व्यवहार करावा ? कशा प्रकारे आपले आचरण ठेवावे ? इत्यादी प्रश्नांना अनुसरून चर्चा केलेली आहे. एकंदर मन्मथ स्वामी यांचे विचार हे आध्यात्मिक आणि संसारिक दोन्ही प्रकारचे आहेत; हेच त्यांच्या विचाराचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

**मन्मथ स्वामी यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये :**

१. मन्मथ स्वामी यांच्या विचारांमधून अनेक तात्त्विक विषय समोर येतात. तत्त्वज्ञानामध्ये प्रामुख्याने सत्ताशास्त्र, ज्ञानशास्त्र, नीतीशास्त्र, सौंदर्यशास्त्र इत्यादी शाखांना अनुसरून विविध संकल्पनांचा अभ्यास करण्याची पद्धत आहे. तेव्हा मन्मथ स्वामी यांच्या विचारांची मांडणी सत्ताशास्त्रीय, ज्ञानशास्त्रीय आणि नीतीशास्त्रीय शाखांना अनुसरून करता येते.

२. मन्मथ स्वामी यांनी आपल्या विचारातून शिवतत्त्वाचा जो विषय मांडलेला आहे. त्यातून त्यांची सत्ताशास्त्रीय भूमिका विशद झालेली आहे. तेव्हा त्यांच्या सत्ताशास्त्रीय भूमिकेची व्यवस्थित मांडणी करून त्याचे विश्लेषण करण्याला वाव आहे.

३. मन्मथ स्वामी यांचे विचार ओवीबद्ध आहेत. त्यांच्या ओव्यांमध्ये अनेक ठिकाणी वेद, उपनिषद, पुराण, आगम, गीता इत्यादी पौराणिक साहित्याचा आणि श्रीकृष्ण, व्यासादिंचा उल्लेख झालेला आहे. यावरून ते शब्द प्रामाण्य किंवा आप्तवचनाचे पुरस्कर्ते आहेत का ? याविषयीची चर्चा करण्याला वाव आहे.

४. मन्मथ स्वामी यांच्या ओव्यांमधून स्वधर्म, संसार सुख, अनासक्त, विषय निवृत्ती, ज्ञानगर्व, लोभ, अभिमान, क्लेश, निष्काम, शुद्धभाव, प्रेम, निर्वाण, कर्म-अकर्म इत्यादी शब्दांनी युक्त अनेक ओव्या आहेत. तत्त्वज्ञानातील नीतीशास्त्र किंबहुना अधिनीतिशास्त्र या शाखेच्या अनुषंगाने या सर्व साज्ञा, पद वा शब्दांची चर्चा करण्याला वाव आहे.

५. भारतीय संस्कृतीमध्ये वेद, उपनिषदाप्रमाणे शैवागम देखील तेवढेच प्राचीन आणि महत्त्वपूर्ण आहेत. आगम २८ प्रकारचे आहेत. त्यापैकी काही आगमांमध्ये 'वीरशैव दर्शन' असा शब्दप्रयोग झालेला आहे. अर्थात आगम या प्राचीन साहित्यातील त्या उल्लेखावरून वीरशैव दर्शन हे एक प्राचीन दर्शन असल्याचे दिसून येते. परंतु भारतीय दर्शनीक परंपरेमध्ये त्यावर फारशी चर्चा झालेली आढळत नाही. मात्र मन्मथ स्वामी यांच्या ओव्यांमध्ये अनेक ठिकाणी

'वीरशैव' हा शब्द पहावयास मिळतो. अर्थात मन्मथ स्वामी यांनी वीरशैव दर्शनाचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. तेव्हा मन्मथ स्वामी यांच्या साहित्याच्या आधारे 'वीरशैव दर्शन' मंडण्याला वाव आहे.

**धर्मचिंतन म्हणजे काय :**

धर्मचिंतन म्हणजे काय ? हे जाणून घेत असताना पहिल्यांदा आपल्याला धर्म म्हणजे काय ? हे जाणून घेणे आवश्यक आहे. जेव्हा धर्माच्या विविध व्याख्या आपण लक्षात घेतो तेव्हा सर्वसाधारणपणे आपण त्या धर्मामध्ये ईश्वर, आराधना, श्रध्दा इत्यादी विषयीचा विचार झाला असल्याचे पाहतो. अशा या धर्माला इंग्रजीमध्ये रिलीजियन असे म्हणतात. परंतु भारताच्या मूळ संस्कृतीचा विचार केला असता व्यक्तीने आपल्या स्वत:च्या अवस्थेचे (Role/भूमिका) स्वरूप लक्षात घेऊन, त्या अवस्थेतील कर्तव्याला जाणून त्यानुसार आचरण करणे म्हणजे धर्म होय, असेही आपल्याला दिसून येते. परंतु ईश्वर आराधना असो की ईश्वराविषयी श्रद्धा व्यक्त करणे असो किंवा प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तव्याला अनुसरून आचरण करणे असो, या सर्वातून मनुष्याला काय साध्य होते आणि मनुष्याने हे सर्व नेमके कुठे साध्य करायचे ? असाही एक प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाच्या संदर्भात महर्षी कणाद यांनी धर्माची केलेली व्याख्या अत्यंत महत्त्वाची वाटते. आपल्या वैशेषिक सूत्रात सांगितल्याप्रमाणे, "यतो अभ्युदय नि:श्रेयस सिद्धि:स धर्म:।" म्हणजे ज्याने अभ्युदय आणि निःश्रेयस सिद्ध होतो त्याला धर्म म्हणतात. कनादांच्या या व्याख्येच्या आधारे आपल्याला असे म्हणता येईल की ईश्वर, आराधना, भक्ती असो अथवा कर्तव्य हे सर्व मनुष्याला संसारिक आणि परमार्थिक सुख प्रदान करण्यासाठी आहेत. अर्थात धर्म ही मनुष्याला त्याच्या संसारिक आणि पारमार्थिक आयुष्यामध्ये सुख प्रधान करून देणारी एक प्रमुख संस्था आहे. आणि अशा या धर्माचे स्वरूप, त्या धर्मातील समस्या आणि त्यावर उपाययोजना इत्यादी संबंधित चे चिंतन म्हणजे धर्मचिंतन होय.

एकंदर ईश्वर, आराधना, श्रद्धा, मनुष्याचे आचरण, मनुष्याचे कर्तव्य, मनुष्याचे ध्येय व्यवहारिक जीवन, परमार्थिक जीवन असे हे सर्व विषय धर्माअंतर्गत येत असल्यामुळे या सर्व विषयांविषयी किंवा यापैकी कुठल्या एखाद्या विषयाविषयी चिंतन करणे म्हणजे धर्म चिंतन होय. अगदी साहित्याच्या भाषेत धर्म चिंतनाची व्याख्या करायची झाली तर आपल्याला असे म्हणता येईल की, "धर्म, धर्म तत्त्वज्ञान, धर्मप्रथा, धर्म साहित्य, धर्म आचरण इत्यादी संबंधित केलेले चिंतन म्हणजे धर्मचिंतन होय."

**मन्मथ स्वामी यांचे धर्मचिंतन :**

शैव परंपरेतील महर्षी कनाद यांनी आपल्या वैशेषिक सूत्रात सांगितल्याप्रमाणे ज्याने अभ्युदय आणि निःश्रेयस सिद्ध होतो त्याला धर्म म्हणतात. म्हणजेच ज्याने संसारिक आणि अध्यात्मिक उन्नती होते त्याला धर्म म्हणतात. सामान्यतः संसारिक उन्नती करिता कर्म, कर्तव्यनिष्ठा, व्यवहार शुद्ध आचरण इत्यादी बाबी महत्वाच्या ठरतात. तर अध्यात्मिक उन्नती करिता तत्त्व, तत्त्वाचे ज्ञान, त्याला अनुसरून करावयाचे ध्यान, मनन, चिंतन आणि व्यवहार इत्यादी बाबी महत्त्वाच्या ठरतात. अशा या दोन्ही बाबतीत मन्मथ स्वामी यांनी आपले चिंतन मांडलेले आहे. यातूनच त्यांचे धर्म चिंतन समोर येते.

मन्मथ स्वामी हे प्रामुख्याने वीरशैव धर्म परंपरेचे पुरस्कर्ते आहेत. त्यांनी वीरशैव धर्म परंपरेला अनुसार तत्त्वरूपात असलेल्या शिवतत्त्वाचे स्वरूप काय आहे या विषयी चिंतन केले. त्यांनी या वीरशैव धर्म परंपरेनुसार मनुष्याच्या आचार आणि विचार या विषयी देखील चिंतन केले. त्यांनी मनुष्याने आपल्या व्यवहारात काय करावे आणि काय करू नये, या विषयी देखील विचार केला. त्यालाच अनुसरून पुढील काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर मन्मथ स्वामी यांनी केलेले चिंतन पाहता येईल :

**शिवतत्त्वा संबंधी चिंतन :**

धर्म परंपरेत ईश्वर हा एक प्रमुख विषय आहे. ईश्वराच्या स्वरूपाविषयी विविध धर्म, पंथ, संप्रदायामध्ये मतभेद किंवा विविधता पहावयास मिळते. मन्मथ स्वामी यांनी, "शंकर तोची निर्विकार । ब्रह्म मायेचा पसार । अवघा तोची परात्पर । शंकराची शंकराची ।। शंकर जळी काष्ठी भरला । पिंडी ब्रह्मंडी बिंबला । अलक्ष दृष्टीने लक्षिला । शंकराची शंकराची ॥" (गाथा-२१) असे म्हणून भारतीय धर्म परंपरेमध्ये शिवतत्त्वाची चर्चा केली आहे. त्यांच्या दृष्टीकोनातून या विश्वाचे मूळतत्त्व ब्रह्म नसून शिव आहे. ज्याप्रमाणे माया ही ब्रह्माचा विकार आहे त्याप्रमाणे ती शिवाचा विकार नाही, तर ती शिवाची शक्ती आहे. आणि म्हणून शिव हा निर्विकार आहे. या शिवाचे स्वरूप स्पष्ट करताना ते म्हणतात, "शिव सगुण निर्गुण, असे परिपूर्ण अविनाश ।।" (गाथा-०५) सर्वसाधारणपणे आपण शिवाला निर्गुणस्वरूपी मानतो. मात्र या ठिकाणी मन्मथ स्वामी यांनी शिवाला सगुण देखील म्हटले आहे. यासंदर्भात आगमांच्या आधारे आपल्याला असे म्हणता येईल की, शिव हे या सृष्टीचे मूळ कारण आहे. शिवाने प्रकृतीला निर्माण करून तीच्याच माध्यमातून या जगताची उत्पत्ती केली आहे. प्रकृती ही सतो, रजो, तमो या तीन गुणांनी युक्त आहे आणि या अर्थाने शिव सगुण ठरतो. मात्र अन्यवेळी त्याची मूळ अवस्था ही निर्गुण आहे. याशिवाय मन्मथ स्वामींनी शिवाला नाद, छंद, प्रेमानंद, सुख, दुःख देखील म्हटले आहे. यातून देखील शिवाच्या सगुणत्वाचा ते परिचय देतात.

शैव परंपरेमध्ये शिवाला वेगवेगळ्या नावाने आणि रूपाने संबोधले जाते. शंकर, उमाकांत, पशुपती, महेश्वर अशा अनेक नावाने शिवाला संबोधण्यात आले आहे. याशिवाय शिवाला गुरु, लिंग, जंगम या ररूपात पाहण्यात देखील आले आहे. यापैकी लिंग या रूपाला अनुसरून मन्मथ स्वामी हे शिवाला जगताचे कारण रूपात पाहतात. ते म्हणतात, "लिंगबोली वेद वोले । लिंगाचाली सूर्य चाले । लिंगआज्ञे वायू हाले । ऐसे पुराणी वोलिले ।। लिंग रचिल्या विश्व रचे । लिंग खचिल्या सर्व खचे । स्थिती नादवी तो साचे । तया आज्ञे सर्व नाचे ।। मन्मथ म्हणे लिंगांकित । सर्व जग हे विख्यात । महापुराणी ही मात । शिव सांगतो सकळा ।।" (गाथा-१२६) या ठिकाणी मनमत स्वामी हे लिंगरूपात असलेल्या शिवाला विश्वासा कर्ता, धर्ता आणि संहार्ता असल्याचे मानतात.

एकंदर मन्मथ स्वामी यांनी आपल्या विचारातून शिवतत्त्वाचा जो विषय मांडलेला आहे. त्यातून त्यांची सत्ताशास्त्रीय भूमिका विशद झालेली आहे.

**सांसार संबंधी चिंतन :**

मन्मथ स्वामी यांच्या दृष्टिकोनातून मनुष्याचा मूळ स्वभाव परमार्थ साधने हा आहे. परमार्थ साधण्याच्या दृष्टीकोनातून काही लोक विविध प्रकारच्या साधना देखील करतात. मात्र असे असताना देखील ते लोक त्या साधनेपेक्षा अधिक संसारात गुरपटून पडल्याचे पाहवयास मिळते. अशा या लोकांना उद्देशून मन्मथ स्वामी म्हणतात, "उदास असावे साधकाचे चित्त । कांता पुत्र वित्त असोनिया । जळाचीया संगी कमल होय वाढी । परी नेदी बुडी तयामाजी । तैसे संसारात असावे अलिप्त॥" (गाथा-४२) अर्थात मन्मथ स्वामी म्हणतात त्याप्रमाणे मनुष्याने कमळाच्या पानासारखे राहावे. म्हणजे ज्याप्रमाणे एखाद्या तळ्यात पाण्याची वाढ होते आणि त्याचबरोबर त्या पाण्यातील कमळाच्या पानाची ही वाढ होते. मात्र ते वाढलेले कमळाचे पान कधीही त्या पाण्यात बुडत नाही. तसेच साधकाने पत्नी, मुलं आणि पैसा असून देखील या संसारात भौतिक सुख मिळविण्यात तल्लीन होऊ नये. कारण "मन्मथ शिवलिंग म्हणे संसारात । सुख अणुमात्र नसे काही ॥" (गाथा-७७) याचा अर्थ असा की खरे सुख, खरे आनंद जर कुठे असेल तर ते परमार्थामध्ये आहे असे मन्मथ स्वामी सुचवितात. पण याचा अर्थ मन्मथ स्वामी हे साधकांना संसारापासून परावृत्त व्हा, संसारातून पलायन करा असे मुळीच म्हणत नाहीत. कारण संसार करीत हा परमार्थ साधता येतो, असा

विश्वास ते साधकांना देतात. याच संदर्भात ते म्हणतात, "संसार धंदा सर्व करा । ध्यानी निज ध्यास धरा । राग करू नका बोला । रात्रंदिवस विवेकाला (गंथन करा) । मन्मथ म्हणे संतालागी । एवढी विनंती परिसा वेगी ॥" (गाथा-६४)

एकंदर मन्मथ स्वामी संसारात राहून विवेकी बनण्याचा उपदेश करतात. एका अर्थाने मन्मथ स्वामी हे अज्ञानाकडून विवेकाकडे जाण्यासाठी मनुष्याने प्रयत्न करावेत असेच या ठिकाणी सबंध सांसारिक लोकांना सुचवीतात.

**काम प्रवृत्ती संबंधी चिंतन :**

भारतीय धर्म परंपरेमध्ये धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगितले जातात. काम हा पुरुषार्थ प्रामुख्याने गृहस्थाश्रमी लोकांसाठी आहे. अर्थात संसारिक जीवन जगत असताना प्रत्येक गृहस्थ पुरुषाने काम या प्रवृत्तीला सामोरे गेले पाहिजे. परंतु आपल्या समाजाची एक वास्तविकता अशी आहे की बहुतांश लोक हे या काम प्रवृत्तीलाच सर्व काही मानतात आणि ते त्यातच रममान होतात. परंतु मुळात या काम प्रवृत्तीमुळे असे हे पुरुष परमार्थ साधू शकत नाहीत. या संदर्भात मन्मथ स्वामी म्हणतात, "कामे नाडीले जनाला । अंतर पडे परमार्थाला । कामे केले देशोधडी । फिरवी संसार बांधोडी। कामे नाडीले थोरासी । इतरांची गती कैसी ॥ (गाथा ९५) या ठिकाणी मन्मथ स्वामी काम प्रवृत्तीमुळे परमार्थ साधता येत नाही हे तर सांगतातच मात्र त्याच बरोबर काम प्रवृत्तीमुळे लोक देशोधडीला लागतात, त्यांचा संसार उध्वस्त होऊ शकतो असेही सुचवितात. आणि म्हणूनच ते वैराग्य या मूल्याचा अंगीकार पुरुषाने केला पाहिजे असे सांगतात. संदर्भात ते म्हणतात, " ज्यासी वैराग्य नसे स्थिरता । रुदी (हृदयी) हळहळ चिंता । तया येथीचा गुह्यार्थ सर्वथा । न ये हता परमार्थ ॥" (स्वयंप्रकाश १/१८)

**नैतिक चिंतन :**

सर्वसाधारणपणे मोक्ष प्राप्तीसाठी किंवा सुख वा आनंद प्राप्तीसाठी नैतिक आचरण केले पाहिजे असे सांगितले जाते. त्या अनुषंगाने आपल्या भारतीय परंपरेमध्ये सत्य, अहिंसा, अस्तेय इत्यादी मूल्य सांगितले जातात. याशिवाय तत्त्व, द्रव्य, पदार्थ अशा मूलभूत विषयाचे ज्ञान प्राप्त केले पाहिजे असेही सांगितले जाते. विशेष म्हणजे आपल्या समाजात अनेक लोक तत्त्वज्ञान आणि मूल्य यांना जाणारे आहेत. मात्र त्यांच्या आचरणात आणि ज्ञानात विसंगती दिसून येते. काहींना तर आपल्या ज्ञानाचा गर्व झालेला असतो. अशा या विसंगत वागणाऱ्या आणि ज्ञानाविषयी गर्व धारण करणाऱ्या लोकांना अनुसरून मन्मथ स्वामी म्हणतात, "ज्ञानगर्वे झाला धीट । वांधून व्युत्पत्तीची मोट ।। वेदशास्त्र अभ्यासिलीं । थोर प्रतिष्ठा जोडिली ।। जळो त्याचें थोरपण । वाचें नाणी उमारमण।। शिवकीर्तनाच्या ठायी । चित्तीं लोभ ज्याच्या नाही ।। नाही भक्तीचा ओलावा (भक्तिहीनता)। पातकी तोचि जाणावा ।। परस्त्री परधन हरणीं । सदा इच्छीतसे मनी।। सर्वकाळ निंदा करी । कोणा राहूं नेदी उरी ।। मन्मथ म्हणे अभिमान । करी दोषाचे साधन ॥" (गाथा-१००) एकंदर गर्व, लोभ, लालसा, निंदा, अभिमान हे दोषाचे साधन आहेत. आणि म्हणून मनुष्याने आपल्या जीवनात सुख किंवा आनंद प्राप्त करायचे असेल तर या दोषापासून पासून स्वतःला वाचविले पाहिजे असे मन्मथ स्वामी या ठिकाणी सुचवितात.

परंतु संसारिक जीवन जगत असताना मनुष्याच्या अवतीभोवती असे काही दोषयुक्त लोक असतात की ज्यांचा प्रभाव आपल्यावर पडतो. आणि त्यातूनच आपल्यातही निंदा करण्याची प्रवृत्ती, स्तुतीचा मोह, कटू वचन करण्याची सवय आणि निर्वाण किंवा शासवत आनंद नसल्याचा भाव उत्पन्न होऊ लागतो. अशा या अनैतिक प्रदेशात वावरणाऱ्या लोकांना उद्देशून मन्मथ स्वामी म्हणतात, "जणोनि न नेणें करी माझें मन । आपुली प्रेमखूण देऊनिया ।। मग मी संसारी असेन व्रतस्थ । जैसे हो जळांत पद्मपत्र ।। ऐकूनी न ऐके निंदा स्तुति कानी । जेवीं कां उन्मनीं योगिराज ।। देखूनी न

देखे प्रपंच हा सृष्टी । स्वप्नीचिया दृष्टी चेवलिया ।। बोलूनी अबोला असावा लैकिक । निर्वाणी निःशंक देहभान ।। मन्मथ म्हणे ऐसें करी कोणेवेळी । जेवी लवण जळी मिळे तेवी ।।" (गाथा-१०४) अर्थात मन्मथ स्वामी हे मनुष्याला पाण्यात राहणाऱ्या कमळाच्या पानाप्रमाणे दृढ, संयमित आणि असंबंध राहण्याचा उपदेश करतात. ते एखाद्या योगी पुरुषाप्रमाणे आपल्या मनाला पूर्णत्वाच्या अवस्थेत नेऊन या संसारिक विषयाच्या बाबतीत अनासक्त आणि निस्पृह असावे असे सुचवितात. विशेष म्हणजे यातूनच निर्वाण प्राप्त होतो याविषयी निशंक रहावे असेही ते म्हणतात.

**निष्कर्श :**

धर्म या संकल्पनेच्या अंतर्गत प्रामुख्याने ईश्वर, भक्ती, मोक्ष आणि मानवाचे आचरण या प्रमुख विषयाला अनुसरून विवेचन केले जाते. अशा या सर्व विषयांच्या संदर्भात मन्मथ स्वामी यांनी देखील चिंतन केले आहे. त्यांचे हे चिंतन खऱ्या अर्थाने त्यांचे धर्मचिंतन आहे. त्यांच्या या धर्मचिंतनामध्ये प्रामुख्याने आपल्याला शिवतत्त्वाचा पुरस्कार झालेला दिसतो. याशिवाय संसारिक लोकांनी नेमकं कसं वागलं पाहिजे याविषयी मार्गदर्शन झालेले दिसते. साधारणतः संत महात्मे हे काम या विषयावर अधिक विवेचन करताना दिसत नाहीत मात्र मन्मथ स्वामी यांनी काम प्रवृत्ती ही मनुष्याला कशाप्रकारे अधोगतीला नेते याविषयी मांडलेले चिंतन हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. याशिवाय बहुतांश संत व महात्मे हे ज्ञान प्राप्त करण्याला महत्त्व देतात परंतु ज्ञान प्राप्त केलेल्या लोकांनी कसे वागावे याविषयी मन्मथ स्वामी यांनी ज्या पद्धतीने चिंतन मांडले आहे ते देखील तितकेच महत्त्वाचे. एकंदर मन्मथ स्वामी यांच्या या धर्मचिंतनातून त्यांची तात्त्विक, नैतिक आणि सामाजिक भूमिका देखील विशद होते.

## संदर्भ सूची :-


१. पसारकर (डॉ.) शे. दे. (संपा.), वीरशैव अभंगगाथा, शैवभारती शोधप्रतिष्ठान, वाराणसी, २०२१

२. मन्मथ स्वामी, शिवाचार्य (डॉ) शिवलिंग, (संपा.), रत्नत्रय, संस्कृती प्रकाशन, अहमदपूर

३. मन्मथ स्वामी, शिवाचार्य (डॉ) शिवलिंग, (संपा.) परमरहस्य, संस्कृती प्रकाशन, अहमदपूर

४. मन्मथ स्वामी व्यक्तिरेखा आणि ग्रंथसंपदा, शिवाचार्य (डॉ) शिवलिंग, संस्कृती प्रकाशन, अहमदपूर

५. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, लेखसंग्रह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती १९९४